# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## आविष्कार स्पर्धेसाठी नियम व अटी

१. शिवाजी विद्यापीठांतर्गत येणारी सर्व महाविद्यालये, मान्यताप्राप्त संस्था व अधिविभागांना या संशोधन स्पर्धेत सहभागी होणे बंधनकारक आहे.

२. सर्व स्पर्धेसाठी संशोधन लेख (Research Paper) आणि पोस्टर्स सादर करणे आवश्यक आहे. तसेच शक्य असेल त्या ठिकाणी पी.पी.टी. व मॉडेल्स सादर करावेत.

३. सहभागाचे पुढीलप्रमाणे तीन स्तर आहेत:

i. पदवी (UG)
ii. पदव्युत्तर (PG)
iii. एम.फिल./पीएच. डी. साठी प्रवेशित असणारे विद्यार्थी (PPG)

४. कोणत्याही शाखेमध्ये शिकत असलेला कोणताही विद्यार्थी खालील कोणत्याही शाखेअंतर्गत सहभाग घेवू शकतो.

i. Humanities, Languages, Fine Arts,
ii. Commerce, Management, Law,
iii. Pure Sciences,
iv. Agriculture and Animal Husbandry,
v. Engineering and Technology
vi. Medicine and Pharmacy.

५. जिल्हास्तरीय व विद्यापीठस्तरीय आविष्कार संशोधन स्पर्धेमध्ये शाखा निहाय प्रथम, द्वितीय, तृतीय, चतुर्थ व पाचवा क्रमांक प्राप्त स्पर्धकांना खालीलप्रमाणे रोख परितोषिके बक्षीस स्वरुपात द्यावयाची आहेत.

| क्रमांक | जिल्हास्तरीय स्पर्धा | विद्यापीठ स्तरीय स्पर्धा |
|---|---|---|
| प्रथम | रु. २,०००/— | रु. ५,०००/— |
| द्वितीय | रु. १,५००/— | रु. ३,०००/— |
| तृतीय | रु. १,०००/— | रु. २,०००/— |
| चतुर्थ | रु. १,०००/— | रु. २,०००/— |
| पाचवा | रु. १,०००/— | रु. २,०००/— |

६. सहभागी होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देण्यात येतील.

७. सहभागी विद्यार्थ्यांसोबत दोन संघव्यवस्थापक असावेत. (एक पुरुष व एक स्त्री)

८. अविष्कार संशोधन स्पर्धेतील सर्व संशोधन प्रकल्प, पोस्टर्स, इत्यादी बाबींचे मुल्यांकन नियुक्त तज्ञांकडून केले जाईल व परिक्षकांचा निर्णय अंतिम राहील.

९. पोस्टर्सची साईज १ मी. X १ मी. असणे बंधनकारक आहे. पोस्टर वर स्पर्धकाचे अगर कॉलेजचे नाव लिहू नये तसेच ओळख स्पष्ट करणारी कोणतीही खून/चिन्ह नसावी. अन्यथा संबंधीत स्पर्धकाचा सहभाग रद्द करण्यात येईल.

१०. स्पर्धेच्या दिवशी संबंधीत संघव्यवस्थापक व स्पर्धकांनी नोंदणी व प्रकल्प मांडणी सकाळी १०.०० वाजेपर्यंत करणे आवश्यक आहे.

११. स्पर्धकांनी आपले वा संबंधीत महाविद्यालयाची तोंडी अथवा लेखी ओळख स्पष्ट होईल असे कोणतेही वर्तन करु नये अन्यथा त्यांचा स्पर्धेतील सहभाग रद्द करण्यात येईल.

१२. नोंदणी प्रवेशिका सर्व कागदपत्रासहीत यजमान महाविद्यालयाकडे/अधिविभागाकडे स्पर्धेच्या दिवशी सकाळी ८.३० ते ९.३० या वेळेत जमा करावीत.

१३. प्रत्येक महाविद्यालयाकडून वरील सहा शाखांकरिता खाली नमुद केले प्रमाणे पदवी (UG) स्तरावरील, पदव्युत्तर (PG), पदव्युत्तर पदवी (PPG) स्तरावरील खाली नमुद केलेप्रमाणे स्पर्धक विद्यापीठ स्तरावरील स्पर्धेत सहभागी होवू शकतात. <u>प्रत्येक स्पर्धा प्रकारासाठी एक पोस्टर/मॉडेल ला एकच विद्यार्थी सहभागी होऊ शकतो.</u>

| Level of Participation | Max no. of participants to be allowed for level 2 Short listing | |
|---|---|---|
| | Institutions having students-strength up to 2999 | Institutions having students-strength 3000 and above |
| UG | 12 | 18 |
| PG | 12 | 18 |
| PPG | 06 | 06 |

१४. जिल्हास्तरीय व विद्यापीठ स्तरीय अविष्कार संशोधन स्पर्धेवेळी आयोजक महाविद्यालयामध्ये नोंदणी करतेवेळी ऑनलाईन पध्दतीने नोंदणी केलेली विद्याशाखानिहाय यादी सोबत खाली नमुद कागदपत्रांची झेरॉक्स प्रत सादर करणे आवश्यक आहे.

अ. सहभागी विद्यार्थ्यांचे ओळखपत्र (चालु वर्षाची नोंदणीसह मा. प्राचार्य यांची सही व शिक्का असणे आवश्यक)
ब. चालू वर्षातील प्रवेश पावती ( साक्षांकित )
क. दहावी बोर्ड प्रमाणपत्र/जन्मदाखला ( साक्षांकित )
ड. गतवर्षीच्या निकालाची प्रत ( साक्षांकित )
ई. चालू वर्षी परीक्षा शुल्क भरलेली पावती ( साक्षांकित )

१५. संबंधीत विद्यार्थ्यांने केलेले संशोधन व्यक्तीगत स्वरूपाचे असावे व ते प्राचार्य किंवा मार्गदर्शक यांपैकी एकाने सांक्षाकित केलेले असावे.

१६. <u>जर यापूर्वी सादर केलेले संशोधन प्रकल्प पुन्हा सादर केल्याचे निर्देशनास आले तर संबंधित महाविद्यालय व विद्यार्थी यांच्यावर विद्यापीठ नियमाप्रमाणे कार्यवाही केली जाईल.</u>

१७. स्पर्धकाला Electric Point ची आवश्यक असेल तर त्यांनी तसा उल्लेख नोंदणी अर्जामध्ये करणे गरजेचे आहे.

१८. विद्यार्थ्यांचा व संघव्यवस्थापक यांचा प्रवास खर्च सहभागी महाविद्यालयाने करावयाचा आहे. सदरचा खर्च यजमान महाविद्यालयाने करावायचा नाही.

१९. प्रत्येक जिल्हयामधुन पदवीस्तरातील १ ते ५ क्रमांकाचे विजेते विद्यापीठ स्तरांवरील स्पर्धेत सहभागी होतील.

२०. विद्यापीठ स्तरावरील स्पर्धेतील प्रत्येक विभागातील १ ते ५ क्रमांकाच्या विद्यार्थ्यांची विद्यापीठामध्ये पुन्हा स्वतंत्रपणे निवड चाचणी घेण्यात येईल व त्यामधुन UG व PG लेवल मधील तीन सर्वोत्कृष्ट स्पर्धक व PPG लेवल मधील दोन सर्वोत्कृष्ट स्पर्धक राज्यस्तरावर विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करतील.

२१. जिल्हास्तरीय अविष्कार संशोधन स्पर्धेमध्ये सर्वात जास्त गुण प्राप्त करणाऱ्या महाविद्यालयास/अधिविभागास सर्वसाधारण विजेते पदाचा फिरता चषक देण्यात येईल.

२२. विद्यापीठस्तरीय अविष्कार संशोधन स्पर्धेमध्ये विद्याशाखा निहाय सर्वात जास्त गुण प्राप्त करणाऱ्या महाविद्यालयास/अधिविभागास विजेते पदाचे फिरते चषक व सर्व विद्याशाखामधून सर्वात जास्त गुण प्राप्त करणाऱ्या महाविद्यालयास/अधिविभागास सर्वसाधारण विजेतेपदाचा फिरता चषक देण्यात येईल.

२३. पदवीस्तरावरील स्पर्धकांनी प्रवेशित जिल्हयांमध्येच भाग घेणे आवश्यक आहे. इतर जिल्ह्यांमध्ये भाग घेता येणार नाही.

२४. पी.जी व पी.पी.जी विद्यार्थ्यांनी थेट विद्यापीठस्तरीय अविष्कार संशोधन स्पर्धेमध्ये सहभागी व्हायचे आहे.

२५. यु.जी, पी.जी व पी.पी.जी विद्यार्थ्यांची पात्रता नियमावलीमध्ये जोडल्याप्रमाणे आहे.

२६. जिल्हास्तरीय अविष्कार संशोधन स्पर्धेचा बक्षिस समारंभ आयोजक महाविद्यालयामध्ये सायंकाळी ४.३० ते ५.३० या वेळेत आयोजित करण्यात येतो.

२७. विद्यापीठस्तरीय अविष्कार संशोधन स्पर्धेमध्येही पहिल्या दिवशी यु.जी. व पी.पी.जी या दोन्ही स्पर्धेचे बक्षिस समारंभ सायंकाळी ५.०० ते ६.०० या वेळेत आयोजित करण्यात येईल. तसेच दुसऱ्या दिवशी सायंकाळी ५.०० ते ६.०० या वेळेत पी.जी. या स्पर्धेचा निकाल व सर्वसाधारण विजेतपदाचे चषक जाहिर करण्यात येईल.

संचालक
विद्यार्थी विकास